# मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## ॲल्युमिनीयम शिडया (लॅडर्स) खरेदीसाठी दरपत्रक सुचना क्रमांक ५२/२००९-१०

विद्यापीठ अभियंता, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी हे (०२४५२-२२४१७०) विविध आकारा व उंचीच्या ॲल्युमिनीयम लॅडर्स खरेदी करण्यासाठी, व्हॅट खाली नोंदणीकृत उत्पादक, पुरवठादार, विक्रेते, कंत्राटदार यांचेकडून दिनांक १५.९.२००९ पर्यंत स्वतःच्या लेटर हेडवर बंद दरपत्रके मागवित आहेत.

तरी अशा प्रकारच्या शिडयांचे उत्पादक, लघुउद्योजक, पुरवठादार, विक्रेते, कंत्राटदार यांनी विविध आकार व उंचीच्या (उंची वाढविण्याच्या सोयीसह) छोटया व मोठया चाकावरील ढकलता येणा-या, मजबुत बांधणीच्या ॲल्युमिनीयम शिडयांचे दर प्रती नग प्रत्येक प्रकारच्या शिडयाच्या तपशीलासह (जसे उंची, वाढीव उंची, चाके, सुरक्षा सोयी, वजन, धक्का प्रतीबंधक उपाय ई.) नमूद करुन इसारा रक्कम व तसेच सोबत निर्माते/अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र, दरसुची, छायाचित्र (असल्यास) इत्यादीसह दिनांक १५.९.२००९ रोजीच्या १६.०० वाजेपर्यत कार्यालयात सादर करावेत. प्राप्त दरपत्रके त्याच दिवशी शक्य झाल्यास १६.३० वाजता उघडण्यात येतील.

**अटी व शर्ती** : १) नमुद केलेले दर हे सर्व खर्च कर, वाहतुक चढाई-उतराई या सहीत असावे, २) अनामत रक्कम रु. ५०००/- किमतीच्या, राष्ट्रीय बॅकेच्या एफडीआर/ टीडीआर/सीडीआरच्या स्वरुपात, किमान एक वर्ष कालावधीचे जोडावे, रोख रक्कम व सवलतीचे प्रमाणपत्र स्विकारले जाणार नाही, ३) सदर पुरवठा हा निधी उपलब्धता व आवश्यकतेनुसार, एक वा अनेक शिडयांसाठी असु शकेल, दर मंजूर झाले म्हणजे पुरवठा करावयास मिळेल असे नाही, ४) कमीत कमी दर हाच दरपत्रक स्विकारण्यामागे मुख्य निकष राहणार नाही तर विद्यापीठाची गरज, विनिर्देश, शिडीचा प्रकार, वापरलेले साहित्य, संकल्पन, इत्यादी बाबी तपासुनच शिडी निवडली जाईल, ५) कोणतेही एक किंवा अनेक किवा सर्व दरपत्रक/दरपत्रके, पूर्णतः किंवा अंशतः नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीकारांनी राखून ठेवलेला आहे, ६) नमुद केलेले दर स्विकारण्यासाठी ९० (नव्वद) दिवसांपर्यंत पुरवठादारावर बंधनकारक राहतील. ७) यशस्वी दरपत्रकधारकाची अनामत रक्कम ही सुरक्षा रक्कमेत परावर्तीत केली जाईल.

जा.क्र.सिईके-४/ /२००९ — विद्यापीठ अभियंता
दिनांक : २९.८.२००९ — मकृवि, परभणी